नि.क्र.३२ (1) स.फौ.ख.क्र.४५५/२०१९

शासन वि. गणपत

**फौजदारी प्रक्रिया संहित, १९७३ चे कलम २७२ व २७७ नुसार न्यायालयीन**

**भाषा मराठीत पुरावा**

**अभियोजन पक्षातर्फे साक्षीदार क्र.०६ ची शपथेवर साक्ष**

मी शपथपुर्वक निवेदन करातो की:

माझे नावः परेश लक्ष्मण मोरे,

वयः३६ वर्षे, व्यवसायः नोकरी, पो.ह.ब.क्र.१२८९,

राहणारः महाड, ता.महाड, जि.रायगड.

**सरतपासणी अभियोग पक्षातर्फे विशेष सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री. व्ही. एस. म्हात्रे यांच्यामार्फत :**

०१. दि.०१/०७/२०१९ रोजीचे रात्री ८.०० ते दुस–या दिवशी सकाळी ८.०० या वेळेमध्ये माझी पोलीस स्टेशन, नागोठणे येथे ठाणे अमलदार म्हणून डयुटी होती. मी डयुटीवर हजर असताना मनोज जाधव यांनी माझेकडे खबर दिली की, त्यांचे चुलते अनंता जाधव हे वांगणी ते आमडोशी या रस्त्यावरुन पायदळ येत असताना आरोपीने त्याचे ताब्यातील मोटार सायकल नोंदणी क्र. एम एच ०६ बी वाय ९१४२ ने मागून येवून त्यांना धडक दिली. त्यांनी दिलेल्या खबरेवरुन मी अपघात क्र. ०८/२०१९ ची नोंद केली. सदर अपघाताचा तपास मी स्वतः केला.

०२. दि. ०२/०७/२०१९ रोजी मी दोन पंचांसह घटनास्थळी म्हणजेच वांगणी आमडोशी रस्त्यावरील बाळसई गावचे हद्दीमध्ये गेलो. घटनास्थळ मला सनील जाधव यांनी दाखविले. त्याठिकाणी सदरील मोटार सायकल रस्त्याचे डाव्या बाजूने उभी होती. सदर गाडीचे नुकसान झाले होते. तेथे मी दिसल्या परिस्थतीप्रमाणे पंचनामा तयार केला. त्यावर माझी व पंचांच्या सहया असून

त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास यापूर्वी **नि.क्र. १५** देण्यात आले आहे.

०३. त्यानंतर मी आरोपीला मोटार वाहन अधिनियम कलम २०९ ची नोटीस दिली. पुढे मी सदर मोटार सायकलची पत्र देवून आरटीओ पेण यांचे कडून तपासणी करुन घेतली व त्यासंबंधी अहवाल मिळविला. पुढे मी साक्षीदारांकडे चौकशी केली व त्यांचे जबाब नोंदविले. प्रस्तूत अपघाताचे तपासाअंती आरोपीने त्याचे ताब्यातील नमुद मोटार सायकल बेदरकातपणे व निष्काळजीपणे चालवून पादचारी अनंत जाधव याला मागून ठोकर दिलयाचे निष्पन्न झाले. त्यावरुन मी आरोपीविरुद्ध शासनातर्फे फिर्याद दिली. सदर फिर्यादीवर माझी सही असून त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **नि.क्र.३३** देण्यात येतो. मी दिलेल्या फिर्यादीवरुन आरोपीविरुद्ध गुन्हा क्र. ४५/२०१९ ची नोंद करण्यात आली. सदर गुन्हयाचा तपास पोलिस हवालदार श्री. मेंगाळ यांचे कडे सोपविण्यात आला. मी आरोपीला ओळखतो. तो आज न्यायालयात हजर आहे.

सरतपास पूर्ण.

**<u>उलटतपासणी आरोपीचे विद्वान विधिज्ञ श्री. आर.बी.सावंत यांचे मार्फत :</u>**

०४. हे म्हणणे खरे आहे की, वाकण– आमडोशी रस्ता रहदारीचा आहे, मनोज जाधव याने कथित अपघात प्रत्यक्ष बघितला नव्हता, त्याला त्या अनुषंगाने माहिती मिळाली होती, सनील भिसे याने देखिल सदर अपघात प्रत्यक्ष बघितला नव्हता.

०५. हे म्हणणे खरे नाही की सनील भिसे याने मला घटनास्थळ दाखविले नव्हते, त्याठिकाणी अपघात झाला नव्हते. हेहे म्हणणे खरे आहे की, अनंत नारायण जाधव याचा जबाब मी नोंदविला नाही. साक्षीदार स्वतःहून सांगतो

शासन वि. गणपत

की, सदर जखमी जबाब देण्याचे स्थितीमध्ये नव्हता.हे म्हणणे खरे नाही की, तो जबाब देण्याचे स्थितीमध्ये नसलयाचे मी खोटे सांगितले, स्थानिक साक्षीदारांचे जबाबावरुन मी आरोपी विरुद्ध खोटी फिर्याद दिली, मला अपघाताचे तपासाअंती आरोपीची चूक आढळली नव्हती, मी अपघाताचा चुकीचा तपास केला, मी खोटा पंचनामा तयार केला, मी आज न्यायालयात खोटी साक्ष दिली.

उलट तपासणी पूर्ण

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्विकृत,

SUNIL SAKHARAM MAHALE

Digitally signed by SUNIL SAKHARAM MAHALE
Date: 2024.06.24 15:59:23 +0530

स्थळ : रोहा. (एस. एस. महाले)

दि.२४.०६.२०२४. न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, रोहा.